जनसंपर्क कक्ष
0 7 SEP 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्टार्टअप यात्रेतून नवसंकल्पनांना सर्वोत्तम संधी

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : जिल्ह्यात ३६ ठिकाणी भेटी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अडचणी दूर करण्याच्या प्रयत्नातूनच नव्या कल्पना जन्माला येतात. शासनाची स्टार्टअप यात्रा ही नवसंकल्पनांसाठी सर्वोत्तम संधी आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. राज्य नावीन्यता सोसायटीतर्फे आयोजित 'स्टार्टअप यात्रा -२०२२'चे आयोजन करण्यात आले. या यात्रेच्या स्वागतप्रसंगी ते बोलत होते. यात्रेचे स्वागत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.



कोल्हापूर : स्टार्टअप यात्रेच्या स्वागतप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आर. के. कामत, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

या यात्रेने विद्यापीठातील 'एसयूके रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' या इनक्युबेशन सेंटरला भेट दिली. त्यानंतर डॉ. एम. एस. देशमुख, प्रद्युम्न आढाव, संजय माळी यांनी योजनांबाबत माहिती दिली. यावेळी डॉ. आर. के. कामत, डॉ. व्ही. एन. शिंदे, अजित चौगुले, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्र २७९ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत २७९ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. उन्हाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. यात ५ इअर लॉ, बीएस्सी, एमएस्सी, नॅनो सायन्स, एमए, बीकॉम, एमलिब, एमए, एमएस्सी, एलएलएम, बीलिब, बीबीए, पीजी डिप्लोमा इन डेटा सायन्स आदी ४३ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे मंगळवारी निकाल घोषित झाले.

दरम्यान, विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेतंर्गत मंगळवारी ४ हजार ९५१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई होईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठ २७९ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील ५६१ परीक्षा सुरू आहेत. त्यापैकी बी. ए., एम.बी.ए. अभ्यासक्रमाच्या चार विषयांच्या परीक्षा पार पडल्या. ही परीक्षा ४ हजार ९५१ विद्यार्थ्यांनी दिली. आतापर्यंत लॉ पाचवे वर्ष, बीएस्सी, बीकॉम, एम. लिप, एम. ए., एम. एस्सी., एल. एल. बी., बी. लिप., बी. बी. ए., आदी २७९ परीक्षांचे निकाल जाहीर झाले. परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी भरारी पथकांची नेमणूक केली आहे, तरी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ नियमानुसार ही परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.